# <u>गहन प्रश्न- सोपे उत्तर</u>

देवा मला गहन प्रश्न पडला

तुझ्याकडे काय मागावे हेच सुचेना

जे काही आवडते आठवते ते सारे

सर्व काही तू मला आधीच दिलेस

देवा तुझ्याकडे काही मागितलेच पाहीजे का

मी तुला बघून स्वताला विसरुन जाते

मग मी बाकीचे कसे लक्षात ठेवू

मी तुला सहजच भेटायला येवू का

देवा मला सतत जाणवते तुझे अस्तित्व

माझ्या अवती भवती तुझे सदा वावरणे

माझ्याकडून वाईट होवू नये म्हणून सावरणे

देवा तुझे आभार मानवसे वाटतात नेहमी

पण त्याचा थिटा अर्थ बोलू देत नाही मला

तुझे उपकार फेडण्याचा एक अल्प विनंती

विश्वाचे भले करण्यासाठी माझे हात वापर